सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा सत्कार करताना प्रा. जयकुमार देसाई, डॉ. मंजिरी मोरे, प्राचार्य डॉ. पी. के. पाटील, एस. एच. पिसाळ. !

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थिभिमुख : डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. २९ : ''देशासमोरील आव्हाने विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित आणि त्यांच्या आवडी निवडी लक्षात घेऊन लवकरच अमलात येणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थीभिमुख, परिपूर्ण आहे. शिक्षणातील सर्व घटकांनी त्याला सामोरे जाण्याची तयारी ठेऊ या,'' असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले. गोपाळ कृष्ण गोखले कॉलेजमधील व्याख्यानात ते बोलत होते. प्राचार्य डॉ. पी. के. पाटील अध्यक्षस्थानी होते. शिक्षण प्रसारक मंडळाच्या प्रशासन अधिकारी डॉ. मंजिरी मोरे यांनी व्याख्यानाचे स्वरूप स्पष्ट केले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचे आजपर्यंतच्या शैक्षणिक, संशोधन कार्याबद्दल सचिव जयकुमार देसाई यांच्या हस्ते सत्कार झाला. तक्षशीला नालंदा विद्यापीठातील पूर्वीची शिक्षण पद्धती, सध्याची शिक्षणपद्धती आणि मॅकलेची शिक्षणपद्धतीचा ऊहापोह करीत आत्मनिर्भर भारताकरिता येणारे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, त्याची उपयुक्ततेवर डॉ. पाटील यांनी माहिती दिली. दौलत देसाई, उपप्राचार्य एस. एच. पिसाळ उपस्थित होते. प्रा. पी. बी. झावरे यांनी परिचय करून दिला. प्रा. डॉ. आर. बी. भुयेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. आर. घाटगे यांनी आभार मानले. प्रा. ए. एम. गाईंगडे, प्रा. डी. के. नरळे यांनी आयोजन केले.

30 MAY 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘भाई, त्वाडा कोल्हापूर कित्ता चंगा सी’

## पंजाबी विद्यार्थ्यांची कोल्हापूर दर्शनानंतर उत्स्फूर्त प्रतिक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ‘भाई, त्वाडा कोल्हापूर कित्ता चंगा सी !’ अर्थात आपल्या कोल्हापुरी भाषेत सांगायचं तर ‘भावा, तुमचं कोल्हापूर लै भारी’ अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया पंजाबी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हिरक महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने विद्यापीठातर्फे आयोजित ‘महाराष्ट्र के रंग, पंजाब की संग’ हा उपक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमाअंतर्गत कोल्हापुरात पाच दिवसीय दौऱ्यासाठी दाखल झालेल्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी काल दिवसभरात कोल्हापुरातील विविध ठिकाणी भेट देऊन कोल्हापुरी संस्कृती आणि पाहुणचाराचा लाभ घेतला. यावेळी त्यांनी कणेरीमठ, न्यू पॅलेस, अंबाबाईचे मंदिर, रंकाळा आणि कोल्हापूर चप्पल लाईनला भेट दिली.



पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी कोल्हापुरातील चप्पल लेनला रविवारी भेट देत कोल्हापुरी चप्पल खरेदीस प्राधान्य दिले.

लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी हे खासगी विद्यापीठ असून विविध राज्यांतील आणि देशांतील मुलं इथे शिकायला येतात. शिवाजी विद्यापीठातील या उपक्रमासाठी विविध राज्यातील विद्यार्थी कोल्हापुरात आलेली आहेत. कोल्हापूरचे दर्शन घेऊन येथील विविध ऐतिहासिक वारसा जाणून घेतला.

कोल्हापूरला दिलेल्या भेटीची आठवण आणि घरच्याकरिता करावयाच्या खरेदीमध्ये पाहुण्या विद्यार्थ्यांनी खासकरून कोल्हापुरी चपलांना पसंती दिली. याशिवाय हस्तकलेने युक्त अशा पर्स, पिशवी आणि कोल्हापुरी दागिने यांचीही खरेदी केली. कोल्हापुरी चटपटीत मिसळ, भेळपुरी, वडापाव यावर पंजाबी मुलांनी ताव मारला. महाराष्ट्राच्या डोंगरांवर पिकणाऱ्या काळी मैना अर्थात करवंदांची चव त्यांनी प्रथमच चाखली.